# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/01/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :— दिनांक ०३/०८/२०१९ चे ०२/२२ वा. दरम्यान फिर्यादी नामे—धर्मेंद्र पुंडलिकराव बनकर, वय २० वर्ष रा. तेलकामठी सावनेर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप. क्र. ५५६/२०१९ कलम ३०७ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०२/०८/२०१९ चे १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— प्रविण धनराज बनकर, वय २८ वर्ष रा. तेलकामठी सावनेर याने जखमी राहुल बनकर याचे आरोपीचे पत्नी सोबत अनैतिक संबंध असल्याचे कारणावरून आरोपीने जखमी राहुल यास गळयावर चाकुने मारून गंभीर जखमी करून जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि सतिश पाटील यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. —१० श्री. आर. आर. भोसले सा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १७/०१/२०२४ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश मा. डी. जे. —१० श्री. आर. आर. भोसले सा. यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम ३२६ भांदवि मध्ये ४ वर्ष सश्रम कारावास व १५,०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने श्री. एपीपी घाडगे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवालदार मधुकर आदमने यांनी मदत केली आहे.

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत मौजा सालई (मोगरा) येथे दिनांक १४/०१/२०२४ चे १८.०० वा. ते दिनांक १५/०१/२०२४ चे १४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सिध्दार्थ श्रीनाथ पखीडे, वय ५१ वर्षे, रा. कोराडी महादूला ता. कामठी जि. नागपूर हे महाराष्ट्र विदयूत विज वितरण केंद्र दहेगाव (जोशी) ता. पारशिवनी येथे वरीष्ठ तंत्रज्ञ या पदावर असून यातील कोणीतरी अज्ञात चोराने मौजा सालई (मोगरा) शिवारातील लघुदाब वाहीनीचे ०६ सिमेंट पोल वरील ॲल्यूमिनीयम विद्युत ए एन टी तार १२६० मीटर किंमती ३५०९१/— रू. चे व जि ए एन टी तार ४२० मीटर किंमती ५१५४/— रू चा असा एकूण ४०२४५/—रूपयाचा मुद्देमाल चोरून नेले व ०६ सिमेंट पोल तोडून नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार अमित यादव यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमित यादव पोस्टे पारशिवनी हे करीत आहे.

# घरफोडी

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर गुलमोहर अपार्टमेंट, थॉपर्स हीरो शो रूमचे मागे, येस बार जवळ बुट्टीबोरी येथे दिनांक १६/०१/२०२४ चे १५.४५ वा. ते १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— चंद्रशेखर आनंदराव पटले, वय ३५ वर्षे, रा. गुलमोहर अपार्टमेंट, थॉपर्स हीरो शो रूमचे मागे, येस बार जवळ, बुट्टीबोरी हे आपल्या कामावर व फिर्यादीची पत्नी घराला कुलूप लावुन सातगाव येथे हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाकरीता गेली असता घराचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात प्रवेश केला असता घरातील वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या दिसल्या. फिर्यादीचे पत्नीने घरातील लाकडी कपाटाची पाहणी केली असता कपाटाचे सुद्धा कुलुप तुटलेले होते. कपाटातील वस्तु अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. कपाटाची पाहणी केली असता कपाटात ठेवलेले १) कानाचे झुमके सोन्याचे ०३ ग्रॅम किंमती ९०००/—रू. २) कानातील झुमक्याची लहर सोन्याची ०३ ग्रॅम किंमती ९०००/— रू. ३) कानातील झुमक्याची लहर सोन्याची ०२ ग्रॅम किंमती ६०००/— रू. व नगदी १०००/— रू. असा एकुण २५०००/— रू. चा मुद्देमाल चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक फौजदार सुरेश धवराळ यांनी भेट दिली असुन सदर घटनास्थळी फॉरेन्सिक वाहनाने भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुरेश धवराळ, मो. नं. ९७६५४९७००५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**